**शिक्षण संचालनालय माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे**

इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने संपूर्ण राज्यात शासन निर्णय दिनांक 25 फेब्रुवारी 2025 नुसार व तदनंतर निर्गमित केलेल्या 6 मे 2025 च्या शासन निर्णय राबविण्यात येत आहे.

राज्यामध्ये एकूण चौथ्या फेरी अखेर 9522 कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी ऑनलाइन संकेतस्थळावर करण्यात आलेली आहे. या महाविद्यालयांमध्ये व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये एकूण प्रवेश क्षमता 21 लाख 50 हजार 479 आहे. चौथ्या फेरी अखेरपर्यंत 14 लाख 38 हजार 894 विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता संकेतस्थळावर नोंदणी केलेली आहे.

दिनांक 2 ऑगस्ट 2025 पर्यंत एकूण चार फेऱ्या पूर्ण करण्यात आल्या असून या फेऱ्यांमध्ये एकूण 8 लाख 82 हजार 81 विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केलेले आहेत. चौथ्या फेरी अखेर एकूण रिक्त जागा 12 लाख 68 हजार 398 आहेत.

ओपन टू ऑल या फेरीमध्ये प्रवेशाकरिता अर्ज करण्यास खालील प्रमाणे वेळापत्रक देण्यात येत आहे.

ओपन टू ऑल या फेरी करिता दिनांक 4 ऑगस्ट 2025 सकाळी 8:00 वाजता पासून ते दिनांक 5 ऑगस्ट 2025 सायंकाळी 6:30 दरम्यानचा कालावधी विद्यार्थ्यांना प्राधान्यक्रम व अर्जाचा भाग एक मध्ये दुरुस्ती करण्यासाठी तसेच नव्याने नोंदणी करावयाच्या विद्यार्थ्यांकरिता देण्यात येत आहे.

पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेश फेरीमध्ये त्यांची नोंदणी करू शकतात व इयत्ता अकरावीच्या प्रवेश करिता प्राधान्यक्रम नोंदवू शकतात. आतापर्यंत झालेल्या चार फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी या प्रवेश फेरीमध्ये त्यांच्या अर्जाचा भाग एक व भाग दोन यामध्ये त्यांच्या आवश्यकतेनुसार बदल व दुरुस्ती करू शकतात.

**ओपन टू ऑल या फेरीअंतर्गत पुढील बाबी विद्यार्थ्यांना करता येतील-**

माहे जुलै 2025 च्या राज्यमंडळ संलग्नित मंडळाचे पुरवणी परीक्षेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येतील. यापूर्वी अपूर्ण अर्जाचा भाग एक व दोन असल्यास अशा विद्यार्थ्यांना त्यांचा अर्ज पूर्ण भरता येईल. ओपन टू ऑल या फेरीमध्ये अर्जाच्या भाग व एक-दोन मध्ये आवश्यकतेनुसार बदल करता येईल व प्राधान्यक्रम मध्ये सुद्धा बदल करता येईल. अद्याप पर्यंत नोंदणी न झालेल्या विद्यार्थ्यांना सुद्धा या फेरीदरम्यान नव्याने नोंदणी व प्राधान्यक्रम देता येतील. यापूर्वी भरलेल्या अर्जाच्या भाग व एक-दोन मध्ये आवश्यकतेनुसार बदल किंवा दुरुस्ती विद्यार्थ्यांना करता येईल.

***टिप: ओपन टू ऑल या फेरीमधील गुणवत्ता याद्या व विद्यार्थ्यांच्या प्राधान्यक्रमानुसार कॉलेज अलॉटमेंट बाबतची यादी प्रसिद्ध करावयाचा दिनांक व वेळ हा दिनांक 6 ऑगस्ट 2025 ला सकाळी दहा वाजता प्रसिद्ध करण्यात येईल***

दिनांक 3 ऑगस्ट 2025
ठिकाण :पुणे

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे